विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभागाच्या आश्रमशाळांमध्ये निवासी विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबत.

महाराष्ट्र शासन
विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग कल्याण विभाग
शासन निर्णय क्र. मविस-२०१९/प्र.क्र.४००/विजाभज-२
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक -१७ जुलै, २०१९

वाचा: शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग क्रमांक व्हीएएस-१०९५/ प्र.क्र.२८/मावक-६, दि.१५/२/१९९७.

प्रस्तावना:-

विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभागामार्फत राज्यात प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळा, विद्यानिकेतन तसेच ऊसतोड कामगारांच्या मुलांसाठी स्वयंसेवी संस्थांना अनुदान देऊन त्यांचेमार्फत आश्रमशाळा चालविण्यात येतात.

विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या आश्रमशाळांमध्ये विजाभज प्रवर्गाच्याच मुलांना निवासी विद्यार्थी म्हणून प्रवेश देण्यात येतो.

मा.राज्यमंत्री (विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण) यांचेकडे विभागाच्या आश्रमशाळा चालविणाऱ्या संस्थांच्या प्रतिनिधींसोबत दि.२४/६/२०१९ रोजी झालेल्या बैठकीत मा.राज्यमंत्री महोदयांनी विजाभज, ऊसतोड कामगार व विद्यानिकेतन या विभागाच्या आश्रमशाळांमध्ये इतर मागासवर्ग मुलांना निवासी विद्यार्थी म्हणून प्रवेश देण्यात यावेत असे निर्देश दिलेले आहेत.

विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभागाच्या प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळा, विद्यानिकेतन तसेच ऊसतोड कामगारांच्या मुलांसाठीच्या आश्रमशाळांमध्ये प्रत्येक इयत्तेत इतर मागासवर्ग प्रवर्गांच्या विद्यार्थ्यांनाही निवासी विद्यार्थी स्वरुपात प्रवेश देण्यास मान्यता देण्याबाबत निर्देश देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्याअनुषंगाने खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

शासन निर्णय:-

विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग कल्याण विभागामार्फत स्वयंसेवी संस्थांना अनुदान देऊन चालविण्यात येणाऱ्या प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळा, ऊसतोड कामगारांच्या मुलांसाठीच्या आश्रमशाळा तसेच विद्यानिकेतन यामध्ये प्रत्येक इयत्तेत ठरवून दिलेल्या मान्य निवासी विद्यार्थी संख्येत इतर मागासवर्ग प्रवर्गातील ५ पर्यंत विद्यार्थ्यांना निवासी विद्यार्थी म्हणून प्रवेश देण्यात यावेत. त्याचप्रमाणे वाचा येथील शासन निर्णय दि.१५/२/१९९७ प्रमाणे अनुसूचित जाती/जमातीच्या ५ पर्यंत विद्यार्थ्यांना निवासी विद्यार्थी म्हणून प्रवेश देणे चालू ठेवावे. असे प्रवेश देतांना विमुक्त जाती भटक्या जमातीच्या विद्यार्थ्यांना प्रथम प्राधान्य राहील. मात्र ज्या

आश्रमशाळांना प्रवेशासाठी विजाभज प्रवर्गाचे विद्यार्थी उपलब्ध होत नसेल फक्त त्याच परिस्थितीत प्राथमिक/माध्यमिक/उच्च माध्यमिक आश्रमशाळांच्या प्रत्येक वर्गासाठी मान्य निवासी विद्यार्थ्यांच्या मर्यादेत ५ विद्यार्थ्यांपर्यंत इतर मागासवर्ग प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना निवासी विद्यार्थी म्हणून प्रवेश द्यावा.

अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना आश्रमशाळांमध्ये निवासी विद्यार्थी म्हणून प्रवेश देण्याबाबत कोणताही बदल नसून शासनाच्या दिनांक १५/२/१९९७ रोजीच्या शासन निर्णयामध्ये नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

वरीलप्रमाणे आश्रमशाळेच्या प्रत्येक वर्ग/इयत्तेत इतर मागासवर्ग तसेच अनुसूचित जाती/ जमाती प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना निवासी विद्यार्थी म्हणून प्रवेश देतांना मान्य निवासी विद्यार्थ्यांच्या संख्येपेक्षा जास्त निवासी विद्यार्थ्यांचे प्रवेश अनुज्ञेय असणार नाही. मान्य संख्येपेक्षा जास्त विद्यार्थ्यांना प्रवेश दिल्यास त्या विद्यार्थ्यांना शासनातर्फे कोणत्याही सोयीसुविधा पुरविण्यात येणार नाही व अशा सोयीसुविधा पुरविण्याची सर्वस्वी जबाबदारी आश्रमशाळा संचलित करणाऱ्या संबंधीत स्वयंसेवी संस्थेची राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१९०७१८११२०१४६१२२ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Bhaurao Raghunath Gavit

Digitally signed by Bhaurao Raghunath Gavit
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=VJNT OBCS SBC Welfare Dept., postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=692454783803b1bf08be0ff2505a01eb578c61edfbb827457be5704f5b440067, serialNumber=950bc6a64b0801087d4b403d7351619557bcd3489ca14b4e0f644bf05a04e89c, cn=Bhaurao Raghunath Gavit
Date: 2019.07.18 11:25:04 +05'30'

(भा. र. गावित)

सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.मंत्री (विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा.राज्यमंत्री (विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय, पुणे.
६. जिल्हाधिकारी (सर्व)
७. प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग (सर्व)
८. सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण (सर्व)
९. जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
१०. सर्व मुख्याध्यापक, विजाभज, प्राथमिक/माध्यमिक/उच्च माध्यमिक आश्रमशाळा,
११. स्वीय सहायक, मा.प्रधान सचिव, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२. निवडनस्ती (विजाभज-२).